उदय नगर (उंद्री) जि.बुलढाणा येथे संविधान दिनी महा.राज्य संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष व फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते मा.दत्ताजी हिवाळे यांनी

**मनोज जरांगे पाटील व महाराष्ट्रात राष्ट्रवादी व शिव सेनेत फुट पाडणाऱ्या सर्व नेत्यांचे आभार मानले** दि.२६ नोहेंबर २०२३ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील उदयनगर ( उंद्री ) येथे भूमीमुक्ती मोर्चाचे प्रणेते भाई प्रदीप अंभोरे व त्यांचे सेनापती भाई बाबुराव सरदार ( जलंब ) यांनी संविधान दिन सोहळा येथील ग्रामपंचायत सभामंडपात आयोजित केला होता त्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असतांना दत्ताजी म्हणाले .----

मी जरांगेंना विशेष धन्यवाद देतो ते यासाठी कि त्यांनी आरक्षणासाठी का होईना जे आंदोलन उभे केले आहे. त्यामुळे सारा महाराष्ट्र ढवळून निघाला आहे त्यात आणखी भर पडली ती राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या झालेल्या फाटा फुटीची , या दोन्ही कारणामुळे संविधान काय म्हणते याचे सखोल मंथन आपण सारेच करू लागलो आहोत . यापूर्वीही संविधान दिन साजरा व्हायचा पण तो एवढया गंभीरतेने नाही आज या दोन्ही प्रश्नावर संविधान काय म्हणते यासाठी साऱ्याच यंत्रणा आणि अभ्यासक गुंतले आहेत.

म्हणूनच या दोन्ही घटनांमुळे व आजच्या राजकीय स्थितीमुळे संविधान काय म्हणते याचा शोध घेण्यासाठी हा अतिशय अनुकूल असा सुवर्णकाळ आपण मानायला पाहिजे आणि आपण कुठे आहोत याचा निश्चित निर्णय होणे आवश्यक होते ते आज होत आहे याचे स्वागतच केले पाहिजे .

संविधान पहिल्याच ओळीत म्हणते WE THE PEOPLEOF INDIA आम्ही भारताचे लोक ,आणि आम्ही म्हणतो – आम्ही अमूक जातीचे , व अमुक धर्माचे लोक,त्यामुळे आम्ही या भारताचे लोक कधी होणार आहोत कि नाही हा खरा प्रश्न आहे. म्हणून मी प्रथम भारतीय आहे हे सांगणारे प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगणे आज आवश्यक झाले आहे त्या बरोबरच माफ करा मला ,बाबासाहेब आरक्षणाला ` पांगुळगाडा ` हि म्हणतात हे हि आपणासर्वांना माहित असायला हवे , हा पांगुळगाडा चालता येई पर्यंतच वापरायचा असतो . त्याच्या कायम वापराने आपले पाय कायमचे अधू करून घ्यायचे नसतात. पण नेमके आज या पांगुळगाड्यासाठी आम्ही जाती धर्माचे शस्त्र आणि शास्त्र करून एकमेकांच्या जीवावर उठत आहोत यालाच आपली प्रगती म्हणायची काय ? आम्ही भारतीय माणूस केंद्रबिंदू मानून इथला या देशाचा कारभार कधी प्रत्यक्षात आणणार आहोत कि नाही कि आणखी किती पिढ्या जाती धर्म आणि वंशाच्या परंपरेच्या गटाराचेच भांडवल करत त्यातच लोळत राहणार आहोत ?

----- २

केंव्हा तरी केंद्रात आणि राज्यात भारतीयांचे भारताचा नागरिक ,माणूस म्हणून सरकार आणणार आहोत कि नाही? याचे उत्तर हे स्वातंत्र्य तुम्हा आम्हा सर्वांना मागते आहे . आणि ते नेमके " जाती धर्म निरपेक्ष " असे आम्ही भारताचे लोक या शब्दांनी आपल्या प्रस्तावनेतूनच या संविधानाने आपणा सर्वांना स्पष्टपणे उत्तर दिले आहे. तो नेमका निर्धार आपण सर्व संविधान प्रेमींनी या कार्यक्रमातून करावा अशी मी विनंती करतो तरच या देशाचे राष्ट्र होईल अजूनही देश आणि राष्ट्र ह्या जाणीवा सुद्धा या ७५.८० वर्षात आपल्या स्पष्ट झालेल्या नाहीत कारण त्या दिशेने आपले प्रशिक्षण केल्या गेलेलेच नाही. त्यासाठी जाती धर्माच्या नावाचे अवडंबर माथी मारून या देशातील ज्या मानवी समूहाचे मानवी हक्कच नाकारलेले होते त्यांना आपणास समान रेषेवर आणण्यासाठी प्रथम माणसांच्या जगात आणावे लागेल तरच या देशाचे खऱ्या अर्थाने ` राष्ट्र ` होईल प.पू.बाबासाहेबआबेडकरांच्या ज्ञानभांडारात या साऱ्या प्रश्नांची उत्तरे साठवलेली आहेत तो बाबासाहेबांचा हरवलेला खिसा शोधण्यासाठी मी या संविधान प्रेमींच्या कार्यक्रमात आलो आहे. तेच त्यांचे निकोप राष्ट्रप्रेम त्यांनी या संविधानाच्या कलमा कलमात पेरलेले आहे.धर्मांतरातराबाबतही प.पु.डॉ. बाबासाहेब स्पष्टपणे सांगतात माझे धर्मांतर कुणाच्या सुडासाठी नाही तर अधर्मातून मुक्ती व्हावी या साठी आहे. ' आय वॉंट रिलिजन बट आय डू नॉट वॉंट हेप्राक्रसी ( ढोंग ) इन दि नेम ऑफ रिलिजन ' हे त्यांनी अतिशय स्पष्टपणे नमूद केले आहे. आरक्षणाच्या आधाराची तरतूद सुद्धा बाबासाहेबांनी विशिष्ट जात धर्म म्हणून केलेली नाही हे आतानव्या शिकलेल्या , लिहतावाचता येणाऱ्यांनी आतातरी या तत्वामागील आशयासहित ती समजून घेतली पाहिजे.म्हणूनच ' जातीसंवर्धन कि जातिनिर्मुलन ' याच उत्तर आपल्या सर्व राष्ट्रप्रेमी व संविधान प्रेमींनी या संविधान दिनी या स्वातंत्र्याला दिल पाहिजे. ते फक्त घोषणांनी होणार नाही तर ते कृतीतून आपल्या जगण्या वागण्यातूनच आपणास द्यावे वे लागेल,आपणा सर्वांना तो विचारस्पर्श व्हावा आणि होईल अशी मी अपेक्षा बाळगतो आपण मला बोलावले,ऐकले ,त्याबद्दल आभार मानतो.